

दुनियादारी परिवाराचा 'एक्सलन्स अवॉर्ड' स्वाती साठे यांना प्रदान !

e Paper

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

वर्ष 3रे

www.metrocityvrutant.in गुरुवार दिनांक 03/04/२०२५ METRO CITY VRUTANT

संपादक : रफी हुसेन || पिंपरी चिंचवड व पुणे || पान 4 || अंक 73 || RNI - MAHMAR51259 || metrocity924@gmail.com


# वक्फ सुधारणा विधेयक लोकसभेत मंजूर

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

केंद्रीय अल्पसंख्यांक मंत्री किरेन रिजिजू यांनी बुधवारी (2 एप्रिल) लोकसभेत वक्फ सुधारणा विधेयक सादर केलं. या सुधारित विधेयकावर प्रदीर्घ चर्चा झाली आणि ते मंजूर झालं.

या विधेयकाच्या बाजूने 288 तर विरोधात 232 मतं मिळाली. त्यामुळे हे विधेयक मंजूर झालं. आता ते राज्यसभेत मांडलं जाईल.दरम्यान वक्फ दुरुस्ती विधेयकावरील मतदानाला पंतप्रधान नरेंद्र मोदी अनुपस्थित राहिल्याचे पाहायला मिळाले.

विरोधी इंडिया आघाडीनं एक दिवस आधी म्हणजे मंगळवारी (1 एप्रिल) बैठक घेत एकत्रितपणे या विधेयकाला विरोध करण्याचा निर्णय घेतला.



भाजपाच्या नेतृत्वाखालील एनडीए आघाडी आणि विरोधी पक्षांची इंडिया आघाडी यांच्यात या विधेयकावरून एकमत नव्हतं. त्यामुळे संसदेत बहुमताच्या आधारे या विधेयकाचं भवितव्य ठरणार होतं. तर भाजपानं मंगळवारी (1 एप्रिल) लोकसभेतील त्यांच्या खासदारांना व्हिप जारी करत बुधवारी (2 एप्रिल) सर्व खासदारांना लोकसभेत उपस्थित राहण्याच्या सूचना केल्या होत्या. वक्फ कायद्यात होऊ घातलेले प्रमुख बदल कोणते आहेत?

दुरुस्ती विधेयकाच्या 'उद्दिष्टे आणि कारणांमध्ये' केलेल्या 'वक्फ'च्या व्याख्येनुसार किमान पाच वर्षे इस्लामचे पालन करणाऱ्या आणि अशा मालमत्तेची मालकी असलेल्या कोणत्याही व्यक्तीने दिलेली देणगी म्हणजे वक्फ होय.

प्रस्तावित दुरुस्ती कायद्यात वक्फच्या जमिनीचे सर्वेक्षण करण्याचे अधिकार अतिरिक्त आयुक्तांकडून काढून घेऊन ते अधिकार जिल्हाधिकारी किंवा उपायुक्तांना दिले आहेत.

नवीन दुरुस्ती कायद्यामध्ये बोहरा मुस्लिम आणि आगाखानी मुस्लिम समुदायाला स्वतंत्र वक्फ बोर्ड स्थापन करण्याची परवानगी दिलेली आहे. केंद्रीय पोर्टल आणि डेटाबेसमध्ये वक्फची नोंदणी केली जाईल. वक्फची नोंदणी केंद्रीय पोर्टल आणि डेटाबेसद्वारे केली जाईल. याच पोर्टलवर वक्फच्या मालमत्तेची देखभाल करणाऱ्या मुतवल्लींना हिशोब सादर करावा लागेल. त्याचबरोबर ज्या मालमत्तांचे निव्वळ उत्पन्न 5,000 रुपयांपेक्षा कमी आहे त्यांच्यासाठी वक्फ बोर्डातील मुतवल्लींचे वार्षिक योगदान सात टक्क्यांवरून पाच टक्के करण्यात आलं आहे. एखादी मालमत्ता ही वक्फअंतर्गत येते की नाही हे ठरवण्याचा वक्फ बोर्डाचा अधिकार काढून घेण्यात आला आहे.

नवीन प्रस्तावानुसार आधीपासून अस्तित्वात असणाऱ्या त्रिसदस्यीय वक्फ लवादाची सदस्यसंख्या कमी करून दोन करण्यात आली आहे आणि या लवादाचा निर्णय अंतिम असणार नाही. या लवादाने दिलेल्या निर्णयाविरोधात 90 दिवसांच्या आत उच्च न्यायालयात दाद मागता येणार आहे.नवीन कायद्यात मर्यादा कायद्याची तरतूद वगळण्याची सोय करण्यात आली आहे. याचा अर्थ असा होतो की, 12 वर्षांहून अधिक काळ एखाद्या व्यक्तीकडे वक्फच्या जमिनींचा ताबा असेल किंवा त्याने त्यावर अतिक्रमण केलं असेल तर त्या व्यक्ती या दुरुस्ती विधेयकाच्या आधारे त्या जमिनींचे मालक होऊ शकतात.

# मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षातर्फे रुग्णांना 22 कोटींची मदत

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

मुंबई : राज्यातील आर्थिक दृष्ट्या गरजू रुग्णांना मुख्यमंत्री सहायता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर अर्थसहाय्य दिले जाते. मुख्यमंत्री सहायता निधी कक्षाने मार्चमध्ये तब्बल २ हजार ५१७ रुग्णांना २२ कोटी रुपयांहून अधिकची मदत केली आहे. सर्वाधिक मदत मेंदू विकार झालेल्या रुग्णांवरील उपचारांसाठी करण्यात आल्याची माहिती कक्षप्रमुख रामेश्वर नाईक यांनी दिली.




मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू करण्यात आलेल्या मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाच्या माध्यमातून विविध रुग्णालयांमध्ये उपचार घेणाऱ्या रुग्णांना आर्थिक मदत करण्यात येत आहे. मुख्यमंत्री सहाय्यता निधी आणि धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष अहोरात्र कार्यरत आहे. या कक्षातर्फे मार्चमध्ये २ हजार ५१७ रुग्णांना आर्थिक मदत केली. यामध्ये सर्वाधिक रुग्ण मेंदू विकाराचे आहे. मार्चमध्ये करण्यात आलेली मदत मागील तीन महिन्यांच्या तुलनेत अधिक आहे, अशी माहिती रामेश्वर नाईक यांनी दिली. यामध्ये मेंदू विकार झालेल्या ४७१ रुग्णांना उपचारासाठी आर्थिक मदत करण्यात आली. तसेच कर्करोगावरील उपचारांसाठी ४२१ रुग्णांना, हिप रिप्लेसमेंटसाठी ३०६ रुग्णांना, अपघातामधील शस्त्रक्रियेसाठी २४७ रुग्णांना, हृदय विकारांवरील उपचारांसाठी २३९ रुग्णांना, अपघाता संबंधित १८४ रुग्णांना, गुडघा प्रत्यारोपणासाठी १५० रुग्णांना, बाल रोगांवरील उपचारांसाठी १४५ रुग्णांना आर्थिक सहाय्य प्रदान करण्यात आले.

डिसेंबर २०२४ ते फेब्रुवारी २०२५ या तीन महिन्यांच्या कालावधीत ५ हजार २५० रुग्णांना आर्थिक मदतीचे वितरण मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीच्या माध्यमातून करण्यात आले. डिसेंबर २०२४ मध्ये १३९२ रुग्णांना १२ कोटी २१ लाख रुपये, जानेवारी २०२५ मध्ये १७८८ रुग्णांना १५ कोटी ८१ लाख २७ हजार रुपये, तर, फेब्रुवारी २०२५ मध्ये २०७३ रुग्णांना १८ कोटी ३४ लाख ६६ हजार रुपयांची वैद्यकीय आर्थिक मदत देण्यात आली.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

गुरुवार दिनांक 03/04/२०२५

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# महापालिकेच्या 97 जुन्या वाहनांचा यशस्वी लिलाव

## लघुत्तम रकमेपेक्षा १९.८२% अधिक महसूल प्राप्त

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी : केंद्र शासनाच्या राज्यांना भांडवली गुंतवणुकीसाठी सामाजिक सहाय्य योजना २०२२-२३ अंतर्गत राज्य शासनाच्या मालकीची १५ वर्षांपेक्षा जास्त आयुर्मान असणारी वाहने टप्प्याटप्प्याने निकामी करण्याच्या निर्देशानुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मालकीच्या ९७ वाहनांचा लिलाव करण्यात आला. या लिलावाद्वारे महापालिकेस ५९ लाख २५ हजार रुपये महसूल प्राप्त झाला आहे.

महाराष्ट्र शासनाच्या परिवहन आयुक्त कार्यालय, मुंबई यांच्या एमएसटीसी (धातू भंगार व्यापार महामंडळ), मुंबई या संस्थेमार्फत ऑनलाईन पद्धतीने हा लिलाव पार पडला. या लिलावामध्ये कार, टाटा सुमो तसेच इतर अवजड वाहनांचा



समावेश होता. प्रादेशिक परिवहन कार्यालय, पिंपरी चिंचवड यांनी ९७ वाहनांची तपासणी करून त्यांची लघुत्तम किंमत ४९ लाख ४५ हजार रुपये निश्चित केली होती. मात्र लिलाव प्रक्रियेद्वारे महापालिकेस तब्बल ५९ लाख २५ हजार रुपये महसूल प्राप्त झाला, जो निश्चित लघुत्तम रकमेपेक्षा ९ लाख ८० हजार रुपये (१९.८२ टक्के) अधिक आहे.या लिलावात ९७ वाहनांची पाच गटांमध्ये विभागणी करण्यात आली होती. या सर्व गटांची विक्री यशस्वीरित्या पार पडली. प्राप्त रकमेमधून २५ टक्के रक्कम एमएसटीसी यांच्याकडे जमा केल्यानंतर विक्री आदेश निर्गमित केला जाणार असून उर्वरित ७५ टक्के रक्कम महापालिकेकडे जमा झाल्यानंतर संबंधित बोलीदारांना वाहनांचे वितरण करण्यात येणार आहे.

महापालिकेच्या वाहन लिलाव प्रक्रियेमुळे केवळ जुन्या वाहनांचा योग्य पुनर्वापर झाला नाही, तर महापालिकेस अपेक्षेपेक्षा जास्त महसूल प्राप्त झाला आहे. ही प्रक्रिया भविष्यातही नियोजनबद्ध आणि पारदर्शक पद्धतीने राबवण्यात येईल, जेणेकरून महानगरपालिकेच्या मालमत्तेचा योग्य विनियोग होईल आणि नागरी सुविधांसाठी अधिकचा निधी उभारला जाईल. - चंद्रकांत इंदलकर, अतिरिक्त आयुक्त (३), पिंपरी चिंचवड महानगरपालिका

# रक्षक चौक येथील सबवेच्या कामाला गती

## विहीत मुदतीत काम पुर्ण करण्याचे नियोजन

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी - पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने सांगवी किवळे रस्त्यावर रक्षक चौक येथे सबवे उभारण्याच्या प्रकल्पाला गती देण्यात आली आहे. सद्यस्थितीत महत्त्वाच्या संरचनात्मक टप्प्यांपैकी काही टप्पे पुर्णत्वास आले आहेत. याशिवाय आरसीसी बॉक्सच्या पायाच्या खोदाई चे काम अंतिम टप्प्यात आले असून, दोन्ही बाजूंच्या रॅम्पच्या बांधकामास वेग देण्यात आला आहे. सबवे प्रवाशांसाठी खुला झाल्यानंतर नागरिकांना सुलभ आणि अडथळाविरहीत प्रवासाचा लाभ मिळणार आहे.

सद्यस्थितीत सबवेच्या आरई पॅनलचे ८० टक्के कास्टिंगचे काम पुर्ण झाले असून पायाभूत सुविधा, जलनि:सारण व्यवस्था आणि मार्ग संकेतांक बसवण्याचे काम सुरू आहे. वाहतूक सुरळीत राहावी यासाठी आवश्यक तात्पुरत्या पर्यायी मार्गांची व्यवस्था करण्यात आली आहे.



तसेच संपूर्ण प्रकल्प निर्धारित वेळेत आणि उच्च गुणवत्तेसह पूर्ण करण्यासाठी सातत्याने देखरेख ठेवली जात आहे.

प्रकल्पाचे स्वरूप

•एकूण लांबी: ३६३ मीटर •औंध बाजूकडील रॅम्पची लांबी: १२५ मीटर •सबवेची लांबी : १८ मीटर •जगताप डेअरी चौक बाजूकडील रॅम्पची लांबी: २२० मीटर •सबवेची रुंदी : २६.४ मीटर •सबवेची उंची : ५.५ मीटर •निविदा रक्कम : १८ कोटी ६५ लाख

प्रकल्पामुळे प्रवाशांना होणारे लाभ

सांगवी-कवळे मार्ग हा पिंपरी-चिंचवड आणि पुणे शहरांना जोडणारा तसेच मुंबईकडे जाणाऱ्या वाहतुकीसाठी अत्यंत महत्त्वाचा मार्ग आहे. वाढत्या शहरीकरणामुळे व औद्योगिक विकासामुळे या मार्गावर मोठ्या प्रमाणात वाहनांची वर्दळ वाढली आहे. तसेच, बीआरटी बससेवा, शालेय बसेस आणि रोजच्या चाकरमान्यांच्या संख्येतही मोठी वाढ झाली आहे. परिणामी, भविष्यात या रस्त्यावर होणारी वाहतुक कोंडी लक्षात घेता सबवे उभारण्याचे काम महापालिकेच्या वतीने हाती घेण्यात आले आहे.

प्रवाशांसाठी सबवे खुला केल्यानंतर वाहतूक सुरळीत होऊन इंधन आणि वेळेची बचत तर होईलच शिवाय पर्यावरणीय हानी टाळण्यास देखील मदत होणार आहे. विशेषतः पुणे, औंध व मुंबई, रावेत मार्गावरून जाणाऱ्या वाहनांसाठी हा मार्ग विनाविलंब आणि विनाअडथळा खुला राहील. परिणामी, पिंपळे निलख गावठाणामध्ये जाण्यासाठी होणारी वाहतूक कोंडी देखील टाळता येईल.

रक्षक चौकात उभारण्यात येणारा सबवे म्हणजे शहराच्या वाहतूक व्यवस्थेत सकारात्मक बदल घडविणारे एक महत्त्वाचे पाऊल आहे. नागरिकांना सुरक्षित, सुलभ आणि विनाअडथळा वाहतूक मिळावी हा यामागचा उद्देश आहे. प्रदूषण आणि इंधनाच्या बचतीबरोबरच, हा प्रकल्प शहराच्या सर्वांगीण विकासासाठी उपयुक्त ठरेल. संबंधित विभागांच्या समन्वयातून हा प्रकल्प निर्धारित वेळेत पूर्ण करण्याचा महापालिकेचा प्रयत्न आहे.

-शेखर सिंह, आयुक्त तथा प्रशासक, पिंपरी चिंचवड महानगरपालिका

रक्षक चौकातील वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी हा सबवे प्रकल्प अत्यंत महत्त्वपूर्ण ठरणार आहे. या प्रकल्पाच्या माध्यमातून पुणे, औंध, रावेत आणि मुंबईच्या दिशेने वाहने विनाअडथळा प्रवास करू शकतील, परिणामी वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणावर कमी होईल व प्रवासाचा वेळ लक्षणीयरीत्या घटेल. तसेच, पिंपळे निलख गावठाणाकडे जाणाऱ्या प्रवाशांना देखील सुरक्षित वळण घेणे शक्य होईल.

-प्रमोद ओंभासे, मुख्य अभियंता, स्थापत्य प्रकल्प विभाग

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत
गुरुवार दिनांक 03/04/२०२५
पिंपरी चिंचवड | पुणे
e Paper

# महापालिकेच्या वतीने मोफत फॅशन डिझायनिंग प्रशिक्षण सुरू

## जास्तीत महिलांनी उपक्रमाचा लाभ घेण्याचे महापालिकेच्या वतीने आवाहन

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी, पिंपरी चिंचवड महानगरपालिका समाज विकास विभागाच्या वतीने भोसरी येथील शिलाई केंद्रामध्ये महिलांसाठी १७ मार्चपासून मोफत फॅशन डिझायनिंग प्रशिक्षण सुरू करण्यात आले आहे. याद्वारे एका बॅचमध्ये सरासरी ३० ते ३५ महिला प्रशिक्षण घेत आहेत. तसेच नुकत्याच दहावी व बारावी परीक्षा दिलेल्या विद्यार्थिनींसह विविध वयोगटातील महिलांचा या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

या प्रशिक्षण कार्यक्रमात महिलांना हाय स्पीड मशीन, पिकोफॉल मशीन, ओव्हर लॉक मशीन, एम्ब्रोईडरी मशीन, स्टीम आयर्न, इलेक्ट्रिक कटिंग मशीन इत्यादी आधुनिक यंत्रसामग्री वापरण्याचे प्रशिक्षण दिले जात आहे. तसेच डिझायनर ड्रेस, ब्लाऊज, स्कर्ट, फ्रॉक, वन पीस, घागरा, आरी वर्क, एम्ब्रोईडरी, फॅब्रिक पेंटिंग, बांधणी बाटिक वर्क अशा विविध कौशल्यांवर भर दिला जात आहे.



**उत्पादनांच्या जाहिरात व विक्रीसाठी डिजीटल मार्केटींगचे देखील देणार प्रशिक्षण** महिलांना स्वतः शिवलेल्या कपड्यांची जाहिरात व विक्री करता यावी यासाठी डिजिटल मार्केटिंगचे प्रशिक्षण (इंस्टाग्राम, फेसबुक, व्हॉट्सअँप) देखील दिले जात आहे. त्याचप्रमाणे, व्यवसाय सुरू करण्यासाठी लागणाऱ्या कच्च्या मालाची उपलब्धता, विक्रीसाठी बाजारपेठ यासंदर्भात पाहणी दौऱ्यांचे आयोजन देखील करण्यात येत आहे.

**प्रशिक्षणासाठी विशेष प्रशिक्षकांची नेमणूक** फॅशन डिझायनिंगचे प्रशिक्षण महिलांना देण्यासाठी विशेष प्रशिक्षकांची नेमणूक करण्यात आली आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली यापूर्वीही कोरोना महामारीच्या काळात 'उमेद जागर' प्रकल्पातील महिलांना यशस्वीरित्या शिलाईचे प्रशिक्षण देण्यात आले होते. सध्या या प्रशिक्षकांच्या माध्यमातून जास्तीत जास्त गरजू आणि इच्छुक महिलांना या उपक्रमात सहभागी करून घेण्यात येत आहे. महिला आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्यासाठी फॅशन डिझायनिंगसारखे कौशल्यपूर्ण प्रशिक्षण अत्यंत महत्त्वाचे ठरू शकते. महिलांनी स्वयंरोजगारातून स्वतःच्या पायावर उभे राहावे यासाठी हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. या प्रशिक्षणाच्या माध्यमातून अत्याधुनिक पद्धतीच्या शिवणकामाचे प्रशिक्षण घेतल्यास बाजारपेठेत जास्त मागणी असलेल्या गोष्टी तयार करण्याचे कसब महिलांमध्ये विकसित होण्यास देखील मदत होणार आहे.

- शेखर सिंह, आयुक्त तथा प्रशासक, पिंपरी चिंचवड महानगरपालिका

महिलांना आर्थिक स्वावलंबन मिळवून देण्याच्या दिशेने महानगरपालिकेचा हा प्रयत्न अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. आधुनिक यंत्रसामग्री, डिजीटल मार्केटिंग, व्यावसायिक मार्गदर्शन आणि फील्ड व्हिजिट यामुळे महिलांना फॅशन डिझायनिंग व्यवसायात यश मिळवण्यासाठी सर्व आवश्यक गोष्टी दिल्या जातील. जास्तीत जास्त महिलांनी या प्रशिक्षणाचा लाभ घ्यावा.

- प्रदीप जांभळे पाटील, अतिरिक्त आयुक्त (१), पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पारंपारिक शिवणकामापेक्षा बाजारपेठेतील मागणी ओळखून त्यासाठी आवश्यक प्रशिक्षण महिलांना देण्याचा या उपक्रमामागचा उद्देश आहे. अत्याधुनिक पद्धतीच्या शिवणकामावर भर देऊन उत्पादनाची गुणवत्ता अधिकाधिक वाढविण्यावरही याद्वारे भर दिला जात आहे. महिलांचे सक्षमीकरण करण्यासाठी तसेच त्यांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी हा महत्वाकांक्षी उपक्रम महत्वाचा ठरणार आहे.

- तानाजी नरळे, सहाय्यक आयुक्त, समाज विकास विभाग, पिंपरी चिंचवड महानगरपालिका

# "उत्कर्ष 2के25" राष्ट्रीय स्पर्धेत सौ.वेणुताई चव्हाण महाविद्यालयाचे घवघवीत यश

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी, पुणे (दि.२ एप्रिल २०२५) विकसित भारत या संकल्पनेला पूर्णत्वास नेण्यासाठी इंजिनिअरिंग व तंत्रज्ञान क्षेत्राचा अतिशय मोलाचा वाटा आहे. "उत्कर्ष २के२५" सारख्या प्रकल्प स्पर्धा विद्यार्थ्यांच्या भविष्याला आकार देण्यासाठी व सर्वांगीण विकासासाठी अतिशय महत्त्वाची भूमिका बजावत असतात. यामध्ये प्रत्येक प्रकल्प ही एक नवीन सुरुवात असते, ती उत्साहाने आणि दृढतेने पुढे घेउन जाणे गरजेचे असते, असे नॅशनल केमिकल लॅबोरेटरीचे वरिष्ठ संशोधक डॉ. राहुल भांबुरे यांनी मार्गदर्शन करताना सांगितले.

पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या (पीसीईटी) रावेत येथील पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड रिसर्च येथे "उत्कर्ष २के२५" या राष्ट्रीय स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी पीसीसीओईआरचे प्राचार्य डॉ. हरिष तिवारी , ई अँड टीसी चे प्रमुख डॉ. राहुल मापारी, समन्वयक डॉ. किरण नप्ते, प्रा. आरती टेकाडे, डॉ. दिपाली शेंडे, डॉ. त्रिवेणी ढमाले, पर्यवेक्षक सचिन पोतदार, कमिन्स अभियांत्रिकीचे प्रा. डॉ. संदीप मुसळे आदी उपस्थित होते




या स्पर्धेमध्ये रोबोटिक्स, सॉफ्टवेअर, आयओटी, अपारंपरिक ऊर्जा, कॉँट्राप्शन, कृत्रिम बुध्दीमत्ता (एआय), मशीन लर्निंग (एमएल) या गटांचा समावेश होता. देशभरातील विविध महाविद्यालयातून १५० संघ सहभागी झाले होते. या स्पर्धेमध्ये सौ. वेणुताई चव्हाण महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी तीनही गटामध्ये प्रथम पारितोषिक पटकावले.

यावेळी पीसीसीओईआर चे प्राचार्य डॉ. हरिष तिवारी, ई अँड टीसी चे प्रमुख डॉ. राहुल मापारी, समन्वयक डॉ. किरण नप्ते, प्रा. आरती टेकाडे, डॉ. दिपाली शेंडे, डॉ. त्रिवेणी ढमाले, पर्यवेक्षक सचिन पोतदार आदी उपस्थित होते.

तसेच कमिन्स अभियांत्रिकी चे प्राध्यापक डॉ. संदीप मुसळे यांनी अभियांत्रिकी ची कोणतीच शाखा इलेक्ट्रॉनिक्स शिवाय परिपूर्ण असु शकत नाही असे सांगितले.

पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त तथा पीसीयुचे कुलपती हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनी स्पर्धेतील विजेत्या संघांना शुभेच्छा दिल्या.

# दुनियादारी परिवाराचा 'एक्सलन्स अवॉर्ड' स्वाती साठे यांना प्रदान !

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



पुणे : शहरातील दुनियादारी परिवार वतीने दरवर्षी दिला जाणारा 'एक्सलन्स अवॉर्ड' श्रीमती स्वाती साठे पोलीस उपमहानिरीक्षक, यांना त्यांच्या समाजसेवा आणि उल्लेखनीय कामगिरीबद्दल नुकताच प्रदान करण्यात आला.

दुनियादारी या संस्थेची स्थापना 2014 साली करण्यात आली. सुरुवातीला केवळ पाच सदस्य घेऊन या समूहाची स्थापना झाली. कालांतराने विविध विषयांवरील समुह तयार झाले, व्यवसाय ,सुरमयी लेखन, इत्यादी समूह तयार झाले. आज या परिवाराची एक हजार सदस्य संख्या आहे. दुनियादारी संस्थेच्या वतीने आजपर्यंत अनेक गरजू व्यक्तींना आर्थिक व विविध प्रकारची मदत करण्यात आली आहे. तसेच दरवर्षी दुनियादारी संस्थेच्या वतीने पुरस्काराचे आयोजन करण्यात येते. दुनियादारीस अनेक पारितोषिके मिळाली असुन, त्याचा स्विकार समीर सप्रे यांनी दुनियादारी संस्थेमार्फत स्विकारला.

श्रीमती स्वाती साठे यांना पुरस्कार प्रदान करतेवेळी आपल्या भावना व्यक्त करताना दुनियादारी परिवाराचे प्रल्हाद साळुंखे यांनी सांगितले की, सेवा परमो धर्मः या तत्वाचा अवलंब करत, तुम्ही समाजाच्या कल्याणासाठी अतुलनीय कार्य केले आहे. तुमच्या नेतृत्वाने आणि करुणेने असंख्य जीवनांना आधार दिला आहे. न्याय आणि सामाजिक कल्याण यामध्ये तुम्ही पूल बांधून समाजाच्या उत्थानासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. तुमच्या कृतींमधून मानवतेला एक संरक्षक मिळाला आहे. तुमचे कार्य इतरांना समर्पणाने सेवा करण्यासाठी प्रेरित करते. दुर्बलांना सक्षम करत, तुम्ही अंधारात आशेचा किरण आणला आहे. तुमची कर्तव्यनिष्ठा केवळ गणवेशापुरती मर्यादित नसून, ती मनापासून समाजासाठी समर्पित आहे. तुमची सेवा म्हणजे निःस्वार्थी योगदान आणि सामाजिक परिवर्तनाचा एक दीपस्तंभ आहे. तुमच्या कार्याचा ठसा केवळ शब्दांत नाही, तर तुम्ही स्पर्श केलेल्या प्रत्येक जीवनात उमटला आहे. समाजाच्या उन्नतीसाठी तुमच्या अथक सेवेला मानाचा मुजरा!

या कार्यक्रमात दुनियादारीचे अध्यक्ष प्रल्हाद साळुंखे व समीर सप्रे यांच्यासह पोलीस डिपार्टमेंटचे वायचळ प्रिन्सिपल, पाटील, ढमाळ तुरुंग अधिकारी व डॉक्टर जी.डी. चव्हाण तसेच माजी आर.एम.ओ. ठाणे प्रदीप करंजुले बिल्डर व दुनियादारीचे सर्व सदस्य उपस्थित होते.

# बनावट कंपनी स्थापन करुन 104 कामगारांचे 'पीएफ' खाते

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत




पुणे : कंपनी अस्तित्वात नसताना १०४ कामगारांच्या नावे बनावट भविष्य निर्वाह खाते (प्रोव्हिडंट फंड) उघडून फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला. बनावट खाते उघडल्याचा प्रकार भविष्य निर्वाह निधी कार्यालयाला माहिती नव्हती. काही कामगारांना खाते बंद करुन पैसे काढण्यासाठी धमकाविण्यात आल्याचा संदेश समाज माध्यमातून पाठविण्यात आला.

त्यानंतर हा प्रकार उघडकीस आला. याप्रकरणी वानवडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.याप्रकरणी श्री गणेश एंटरप्रायजेसचा मालक सीताराम ठकाणसिंग याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. याबाबत भविष्य निर्वाह निधी कार्यालयातील अधिकारी जयकिसन मोहनदास मनवानी (वय ४९, रा. महेश सोसायटी, बिबवेवाडी) यांनी वानवडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, श्री गणेश एंटरप्रायजेसचे सीताराम ठकाणसिंग (रा. साठे वस्ती, सणसवाडी) यांनी भविष्य निर्वाह निधी कार्यालयाच्या संकेतस्थळावर श्री गणेश एंटरप्रायजेस या फर्मच्या नोंदणी केली होती. २३ डिसेंबर २०२० रोजी त्यांनी याबाबत अर्ज केला होत. त्यानंतर त्यांना कार्यालयाकडून सांकेतिक क्रमांक देण्यात आला. या कंपनीत १०४ कामगाराच्या नावे ऑनलाइन पद्धतीने 'पीएफ' खाते उघडण्यात आले.

त्यानंतर श्री गणेश एंटरप्रायजेस नाव असलेल्या वेगवेगळ्या कंपनीतील ११ कर्मचाऱ्यांनी ईमेलद्वारे जून २०२४ मध्ये भविष्य निर्वाह निधी कार्यालयाकडे तक्रार दिली.

संबंधित कंपनीत काम केले नसल्याचे त्यांनी कळविले होते. त्यांच्या संमतीशिवाय बनावट 'पीएफ' खाते उघडण्यात आल्याच्या तक्रारी करण्यात आल्या. संबंधित खाते रद्द करण्यासाठी अज्ञाताने समाज माध्यमातून संदेश पाठविला असून, तो पैसे मागत असल्याच्या तक्रारी करण्यात आल्या.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 8999948968